RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक १७] शुक्रवार, मार्च १२, २०२१/फाल्गून २१, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

### असाधारण क्रमांक ३२

### प्राधिकृत प्रकाशन

### रत्नागिरी नगर परिषद, रत्नागिरी यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये

क्रमांक रनप/नगररचना/१५०७/५९८०/२०२०-२१

**सूचना**

रत्नागिरी शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस १८९९/९३ सी. आर. क्र. १८६/ए/९९ यूडी-१२ दिनांक २७ एप्रिल २००० अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक २१ जून २००० पासून अंमलात आली आहे. आणि या सुधारित विकास आराखड्याचा उर्वरित भाग (ईपी ३१ वगळता) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्रमांक टीपीएस/१८०१/४४१/सी.आर.क्र.३५/०२ यूडी २१ दिनांक १७ जून २००५ अन्वये मंजूर केला असून तो दिनांक २७ जून २००५ पासून अंमलात आला आहे.

या विकास योजनेतील झाडगांव-मि-या रस्ता ते खालची आळी रस्ता यातील मोकळ्या जमिनीवर केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक शहर विकास योजने अंतर्गत लघुउद्योग वसाहत जमीन भूसंपादन करून विकसित केलेली आहे व त्याचा वापर सुरू आहे. या रस्त्याचे दक्षिणेकडील खालच्या आळीस लागून अस्तित्त्वातील गोवंडला ६.१० मी. प्रस्तावित रस्ता रूंदी सुधारित विकास योजनेत नियोजिलेली आहे.

सदर अस्तित्त्वात असलेला पारंपरिक गोवंडला दर्शविलेली रस्ता रूंदीची आवश्यकता नसलेने प्रस्तावित केलेली मौजे झाडगांव, स. नं. ११४, न. भू. क्र. १२१७ या जमिनीमधून दर्शविलेली ६.१० मी. रस्ता रूंदी रद्द करावी अशी मागणी जमीन मालकांनी अर्जाद्वारे केली आहे.

रत्नागिरी शहर सुधारित विकास योजनेतील प्रस्तावित ६.१० मी. रूंदीची रस्ता रूंदी आवश्यक नसलेची बाब विचारात घेऊन ती रद्द करणेबाबत अस्तित्त्वातील गोवंड कायम ठेवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये बदल करणेची कार्यवाही हाती घेणेस सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ४१ दिनांक १६ जुलै २०२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. प्रस्तुत फेरबदल नकाशामध्ये हिरव्या रंगाने दर्शविणेत आला आहे.

त्याअर्थी सर्व नागरिकांना असे कळविणेत येते की, ज्यांना या किरकोळ बदलांबाबत आपल्या सूचना अगर हरकती द्यावयाच्या असतील त्यांनी सदरची जाहीर सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रा**मध्ये प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे मुदतीत लेखी स्वरूपात रत्नागिरी नगर परिषदेच्या कार्यालयात सादर कराव्यात म्हणजे त्याचा विचार प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीकरिता सादर करण्यापूर्वी करणेत येईल.

नियोजित किरकोळ बदल दर्शविणारा नकाशा नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून ठेवलेला आहे.

**श्री. प्रशांत नागनाथ ठोंबरे,**
मुख्याधिकारी,
रत्नागिरी नगर परिषद,
रत्नागिरी,
दिनांक १२ मार्च २०२१.

**प्रदीप प्रताप साळवी,**
अध्यक्ष,
रत्नागिरी नगर परिषद, रत्नागिरी.

## RATNAGIRI MUNICIPAL COUNCIL, RATNAGIRI

**Under Section 37(*1*) of Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966**

(क्र. रनप/नगररचना/१५०७/५९८०/२०२०-२१)

*NOTICE*

Whereas the Revised Development Plan of Ratnagiri Town has been partly sanctioned *vide* Government of Maharashtra, Urban Development *vide* Government Resolution No. TPS 1899/13 CR No.186/A/UD-12 dated 27th April 2000 and came into force with effect from 21st June 2000 and whereas the remaining part of this Development Plan (except EP31) has been sanctioned by the Government of Maharashtra *vide* Urban Development Department *vide* Notification No. TPS/ 1801/441/C.R. No. 35/02 UD 21 dated 17th June 2015, which came into force with effect from 27th June 2005.

The Light Industrial Estate has been developed on the open land between Zadgaon-Mirya Road to Khalachi Aali, by acquiring land under Integrated Town Development Scheme by Central Government and Govt.of Maharashtra. The 12.19 wide road leading to the Light Industrial Estate towards south side of the said estate has been developed, which is in existence today. The widening of 6.10 Mtr. wide road is proposed to the existing Govand leading towards Khalachi Aali, to the south side of the this road.

Whereas the land owner has requested *vide* his application that since the widening of the road to the existing traditional Govand is not necessary, the proposed road widening of 6.10 mtr. wide proposed road through the land bearing Survey No.114, Hissa No.11217 may please be cancelled.

Whereas taking into consideration the fact that, by keeping intact the existing Govand, the proposed road widening is not necessary, hence the sanction has been given to cancel this proposed 6.10 M. road widening, *vide* Resolution No. 41, in the General Meeting dated 16th July 2020 under section 37(*1*) of Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966. The proposed modification are shown by Green colour in the plan.

Therefore, it is hereby informed that those who wants to give their suggestions or objections to the said proposed modification, may submit the same in office of Municipal Council Ratnagiri in writing within a period of one Month from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*, so as to consider the same before submitting the final proposal of modification for sanction to the Government of Maharashtra.

A map showing proposed minor modification has been kept in Ratnagiri Municipal Office for inspection by public during office hours.

PRASHANT N. THOMBARE,
CEO,
Ratnagiri Municipal Council,
Ratnagiri,
Dated the 12th March 2021.

PRADIP PRATAP SALVI,
President,
Ratnagiri Municipal Council.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.